ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!





## गोष्ट क्र.२३

आपण भारतातली न्याय व्यवस्थेची स्थिती पाहिली तर जाणवतं, खरंतर आपले सगळे कायदे हे अतिशय चांगले बनवलेले आहेत. पण आपणही नागरिक म्हणून आपली जबाबदारी कशा प्रकारे उचलतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरतं. आपण हक्कांबद्दल बोलतो, पण कर्तव्य विसरून जातो. आपण ही कर्तव्यं जर सांभाळायला लागलो तर implementation करणं हे काही फार अवघड जाणार नाही. नागरिकशास्त्र शिकवताना एका विषयाच्या पुढे जाऊन काही शिकवायला पाहिजे असं वाटतं. ही मूल्ये लहानपणापासून बिंबवली जायला पाहिजेत. यासाठी तळमळीने काम करणाऱ्या शिक्षकांची गरज आहे. आज असे शिक्षक कमी दिसतात. हे असं का होतंय? याचा विचार केला गेला पाहिजे. एका चांगल्या शिक्षकामुळे आपण खूप सकारात्मक गोष्टी शिकतो. आज प्रबोधिनीसारखं मूल्याधिष्ठित शिक्षण सगळ्यांना मिळत नाही.

दीप्ती निकम – वाघमारे
(१९८२–१९८८)

प्रबोधिनी हा माझ्या आयुष्यातला इतका वेगळा आणि सुंदर भाग आहे की आज मागे वळून बघताना प्रबोधिनी नसती तर काय असा प्रश्न पडतो. माझ्या आई-बाबांना प्रबोधिनीबद्दल फारसं माहित नव्हतं. आम्ही तीन बहिणी. मोठ्या बहिणीला आमच्या आधीच्या शाळेतल्या शिक्षकांच्या सांगण्यावरून प्रबोधिनीत घातलं आणि मग त्या सुंदर अनुभवावरून माझाही प्रबोधिनीत प्रवेश झाला. शाळेत आल्यानंतर खूप मोकळं असल्यासारखं वाटत होतं.





शाळेतील अध्यापिका व मैत्रिणी

शाळेत शिस्त ही होतीच. पण कायम सर्वांगीण विकासाला शाळेत महत्त्व जास्त दिलं. पाठ्यपुस्तकी अभ्यासाचा केवळ ५०% च भाग होता. त्याच्यापेक्षा जास्त वर्गाबाहेरचं, पुस्तकाबाहेरचंच शिकल्याचं मला आठवत आहे. प्रबोधिनीत शाळा संपल्यानंतरही येत रहावसं वाटतं याच्यामागे हेच कारण होतं. प्रबोधिनी ही काही अभ्यासाची शाळा नव्हती, तर ही जीवनाची शाळा होती असं म्हणायला हरकत नाही. अनेक शिक्षक, विक्री उपक्रम, प्रकल्प, कराटे प्रशिक्षण, गृहशास्त्र, दौरे यातून आपण अनुभवसंपन्न होत जातो. आपल्यावर जबाबदारी टाकली जाते, ती घ्यायला शिकवलं जातं. त्याचा पुढच्या आयुष्यासाठी खूप उपयोग होतो. गटकार्य, सगळ्यांना एकत्र घेऊन पुढे जाणं याचं बाळकडू आपल्याला प्रबोधिनीतून मिळालेलं आहे.

**प्रकल्प – जोडी कार्यासाठी पुणे दर्शन**

प्रकल्पाबद्दल सांगण्यासारख्या खूप आठवणी आहेत. आमचं जे जोडीकार्य होतं त्यामध्ये माझी मैत्रीण अपर्णा डिंबळे-आवटे व मी आम्ही दोघींनी मिळून पुण्याची वाहतूक समस्या या विषयावर प्रकल्प केलेला होता. हा विषय निवडल्यानंतर त्याची सुरुवात केली ती शून्यापासून. कारण कुठल्याही पुस्तकात याबद्दल कधीच काहीच लिहिलेलं नव्हतं. त्यामुळे कुठे वाचून, टिपणं काढून प्रकल्प करायचा नव्हता. मग त्यासाठी आम्ही, पूर्ण माहिती मिळावी म्हणून सगळ्या पेठा पायी हिंडलो होतो, ट्रॅफिक पोलिसांची मुलाखत घेतली, ट्रॅफिक कमिशनर साहेबांची मुलाखत घेतली. आमच्या प्रकल्पाची निवड जिल्हास्तरीय प्रकल्पामध्ये झाली होती. मला वाटत, असं कुठल्या शाळेत कधीच पहायला मिळत नाही. त्यातून शिकलेलं गटकार्य हे खूप उपयोगी ठरलं.

**अभ्यासदौरा**

९वीत असतानाच्या सुट्टीतला दौरा म्हणजे गुरखालँडचा. तेव्हा तो प्रश्न खूप ज्वलंत होता. आम्ही काही युवती तिथे गेलो होतो. तिथले जे प्रमुख होते, सुभाष घिशिंग यांची मुलाखत आम्ही घेतली होती. त्या दौऱ्यात कलकत्ता, दार्जीलिंग, नेपाळ, अयोध्या, अलाहाबाद हे फिरून आलो होतो. प्रबोधिनीत उपासनेला खूप महत्त्व आहे, ज्याच्यामुळे आयुष्य बदलू शकतं. आम्ही जेव्हा दौऱ्याला जायचो, तेव्हा आम्ही रेल्वेमध्ये बसून उपासना करायचो.



गुरखालँड अभ्यासदौरा

**रुंदावलेली क्षितिजे**

१०वी झाल्यानंतर शाळेपासून लांब कधीच गेले नाही. ११वीत असताना बिहारमध्ये भूकंपानंतरचे मदतकार्य करायला गेले होते. पुण्यातून एकूण मिळून सुमारे १०० जण त्यात सहभागी होतो. आजकाल मोबाईल आहेत पण तेव्हा अगदी दूरध्वनीसुद्धा नसायचे, आणि तरीही आमच्या पालकांनी प्रबोधिनीचं काम आहे ना! मग जा! असं म्हणून आम्हाला पाठवलं होतं. तिथली लोकं तेव्हा आम्हाला विचारत होते, की आपके माँ-बाप ने लडकी होते हुए आपको बिहार कैसे भेज दिया? एवढी वाईट परिस्थिती तेव्हा होती. तिथे प्रत्येक गावात जाऊन आम्ही कोणाला काय मदतीची गरज आहे त्याचा आढावा घेतला, ती मदत पुण्यातून गोळा केली होती, हा अनुभवही खूप काही देऊन गेला. हे फक्त आणि फक्त प्रबोधिनीतच मिळू शकतं.

अपर्णा आणि मी कन्याशाळेच्या ८वी-९वीच्या विद्यार्थिनींचे अभ्यासकौशल्याचे तास घ्यायला वर्षभर जायचो. पण त्याच्याआधी ते प्रबोधिनीत आम्हाला शिकवलं जायचं. मग त्यातल्या काही मुली प्रबोधिनीशी जोडल्या गेल्या. मग त्यांना

दलात सामील करून घेतलं, त्यांना बर्च्या शिकवल्या, त्यांची सहल एसटी ने सिंहगडावर घेऊन गेलो होतो. आज या सगळ्या गोष्टी जेव्हा मागे फिरून आठवतात, तेव्हा असं लक्षात येतं की सर्वांगीण विकास होण्यावर प्रबोधिनीने खूप भर दिला. इथे जे काही मिळालं ते बाकी कुठे मिळण अशक्य आहे.

पडसऱ्याला एक शाळा आहे. तिथे १०० दिवसांची शाळा असा प्रयोग चालू होता त्यामध्ये शिकवायला अपर्णा, मी आणि शाळेमधून नववी मधील दोघेजण असे गेलो होतो. तिथला सगळा आतला प्रवास खूप मोठा होता. आठ दिवस झाल्यांनतर पुढचा गट आलाच नाही. मग आयत्यावेळी काही दूरध्वनी नाही, घरच्यांना निरोप नाही. आम्हाला १५ दिवस तिथेच रहावं लागलं. पण आमच्या पालकांनी कधीच तक्रार केली नाही कारण प्रबोधिनीवरील त्यांचा विश्वास.

मी ११वी १२वी नंतर BA, Political science केलं आणि मग काहीतरी वेगळं करणं आपल्याला शक्य आहे असा विचार करून कायद्याच्या अभ्यासासाठी प्रवेश घेतला. मला लेबर लॉमध्ये काम करावसं वाटलं, म्हणून मी दोन-तीन वर्षं प्रॅक्टीस केली आणि त्यानंतर मी MPM ची डिग्री घेतली. प्रॅक्टीस करताना तत्त्व आणि मूल्यांशी तडजोड करावी लागायची, अशावेळी नाही, आता पुढे हे शक्य नाही, आपण आपल्या मूल्यांशी तडजोड करू नाही शकत असं म्हणत मी प्रॅक्टीस करायची नाही असं ठरवलं.

**सहजीवन आणि भरारी**

१९९५ साली माझं लग्न झालं. आमचं arranged marriage होतं, माझ्या नवऱ्याने IIT Bombay मधून M. Tech केलं. तेव्हा बोलताना मी पहिल्यांदा त्याला विचारलं होतं की तुझा देशाबाहेर जाऊन काम करण्याचा विचार आहे का? प्रबोधिनीचे संस्कार असल्यामुळे आपल्या शिक्षणाचा उपयोग इथेच व्हायला हवा हे पक्क होतं. सुदैवाने आमच्या दोघांचेही मत जुळलं हे मला खूप आवर्जून सांगावसं वाटत.

आमच्या दोघांचीही आर्थिक परिस्थिती बेताची होती, घरातून आई-बाबा फार काही शिकलेले नव्हते. या पार्श्वभूमीवर २००० साली आम्ही आमची नवीन Precient Technologies नावाची कंपनी सुरू केली. तेव्हा कंपनी म्हणजे काय दुसऱ्या एका कंपनीच्या जागेत दोन कॉम्प्युटर हीच आमची कंपनी असं म्हणायला हरकत नाही. ते करत असताना माझा मुलगा लहान होता तेव्हा मी घरून HR आणि legal गोष्टी बघत होते. पण त्यानंतर मात्र मी पूर्णवेळ कामाला सुरुवात केली.
Prescient शून्यापासून उभी करावी लागली होती. आमच्याकडे तयार असं अगदी काही म्हणजे काहीच नव्हतं. माझ्यासाठी माझ्यावर पडलेली जबाबदारी अगदी नवीन होती आणि यातील काहीच अनुभव नव्हता. कंपनी मधील प्रत्येक पॉलिसी आणि प्रोसेस स्वतःच अभ्यास करून formulate करण्यापासून सुरुवात झाली. HR आणि legal या दोन जबाबदाऱ्या होत्याच, पण पुढे असं लक्षात आलं की accounts, taxation आणि त्यासंबंधित गोष्टी जर आपल्याला कळत नसतील तर आपल्याला पुढे काही जाता येणार नाही. जरी आपण कुणाला नेमलं तरी त्यातलं चूक-बरोबर कळण्याइतपत तरी गोष्टी कळायला हव्यात या विचाराने अगदी tally enter करण्यापासून शिकायला सुरुवात केली. Balance sheet कसे बघायचे हे देखील कळायचे नाही. स्वतःचं स्वतः शिकून घ्याव लागलं होतं. हे आपल्याला जमणार नाही असा कधी विचारच केला नाही, जे आव्हान समोर येईल ते स्वीकारत गेले. कोणतेही काम आपण करू शकतो हे प्रबोधिनीमध्ये झालेले संस्कार खूप उपयोगी पडले. या वीस वर्षांमध्ये Prescient २५० कर्मचाऱ्यांपर्यंत पोचली आहे. त्यासाठी अनेक प्रकारचा अभ्यास करणं, नवीन नियमावली तयार करणं यासारख्या गोष्टी आजही कायम करत रहाव्या लागतात.



**प्रेशंट फॅमिली**

सुरुवातीचा काळ कठीण होता, परंतु हळूहळू आमच्या clients चा आमच्यावर विश्वास बसत गेला. अशाच एका कॅनडाच्या कंपनीसाठी आम्ही software तयार करत होतो, त्यांच्याकडून बरीच कामं मिळत गेली. सुरुवातीला सगळी communications mail वरच झाली. पुढे ४-५ वर्षांनी क्लायंट बरोबर प्रत्यक्ष भेट झाली, एवढा त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवला होता. आणि हा विश्वास असाच आला नाही तर काम करण्याची प्रामाणिक तळमळ पाहूनच एवढा विश्वास तयार झाला. या विश्वासामुळेच पुढे त्यांनी भारतामध्ये Prescient बरोबर PolyWorks Software India



**My Team**

नावाने joint venture सुरू केलं. त्या collaboration ची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर होती. हा माझ्यासाठी अतिशय चांगला अनुभव होता. आजही जेव्हा मी वेगळ्या कंपन्यांबरोबर काम करते तेव्हा मला त्यांच्या देशातील कायदे शिकावे लागतात, त्यांचा काही प्रमाणात अभ्यास करावा लागतो. प्रत्येक ठिकाणच्या कायद्यातल्या बदलावर लक्ष ठेवावं लागतं, त्यानुसार कंपनीमध्ये बदल करावे लागतात. हा सगळा सध्याच्या माझ्या कामाचा खूप मोठा भाग आहे. आमच्या विदेशी clients कंपन्या भारतात आल्यावर त्यांना आपल्या इथले कायदे समजून देण्यासाठी मी legal guide म्हणूनसुद्धा काम करते.

आमच्या कंपनीमध्ये आम्ही कधीच आर्थिक व्यवहाराबाबतीत तडजोड करत नाही. सगळे व्यवहार १००% पारदर्शक ठेवतो. सरकारी काम करताना सामान्यत: कुठे तडजोड करावी लागते की काय असा प्रश्न असतो. पण जर तुम्ही तुमच्या मूल्यांवर ठाम असाल आणि तुमचे व्यवहार स्वच्छ असतील तर सरकारी अधिकारी मनापासून तुम्हाला साथ देतात असा आमचा अनुभव आहे. जेव्हा आमच्याकडे tax scrutiny साठी सरकारी अधिकारी येतात, तेव्हा ते न सांगता येतात, मग हे काम जवळपास दोन-तीन दिवस चालतं. पण आमच्याकडे येऊन या सगळ्यांचं मत बदललेलं असतं. काही अधिकाऱ्यांनी तर आम्हाला उघडपणे प्रतिक्रियाही दिल्या होत्या की असे रेकॉर्डस आम्ही कुठे पाहिलेच नाहीत. **एकदा scrutiny साठी अशाच एक मॅडम आल्या होत्या, त्यांनी त्यांचं काम करायला सुरुवात केली. त्यांनी सगळं काही तपासून पाहीलं. त्या माझ्याकडे संध्याकाळी चार वाजता आल्या आणि म्हणाल्या, की मला तुमची scrutiny** करण्यासाठी **चार दिवस दिले होते, पण माझं काम एका दिवसात झालेलं आहे. तुमच्यामुळे मला तीन दिवसाची सुट्टी मिळाली. तुमचे रेकॉर्डस इतके चांगले आहेत. हे आमच्या company चं culture आहे.** आम्ही स्वतः त्यात सहभागी झालो, सगळ्या गोष्टी मुळापासून



**CIO Review - 2018**

शिकून घेतल्या. प्रामाणिकपणा आणि सगळे काही शिकून घेण्याची इच्छा या दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. या सगळ्यात गटकार्य अर्थातच महत्त्वाचं असतं. सहकाऱ्यांचे उत्तम गुण हेरून, आपलं ज्ञान वाटून घेऊन, सगळ्यांना एका पातळीवर घेऊन पुढे जाणं हे महत्त्वाचं ठरलं. आता माझ्याबरोबर दहा वर्षं काम करणारी लोकं आहेत.

आम्ही कंपनीमध्ये बऱ्याच ग्रामीण भागातील तरुणांना नोकरीच्या संधी द्यायचा प्रयत्न करतो. त्यांच्या बुद्धिमत्तेचा कधीच प्रश्न येत नाही. ती मुलं कष्टाळू आणि चांगली असतात. संवादात्मक जी काही दरी त्यांच्यात जाणवते, त्यासाठी आम्ही तसं प्रशिक्षण देतो आणि नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतो.

**योगसाधना**

योगसाधना माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. अध्यात्म किंवा योगसाधना म्हणल्यावर बऱ्याचवेळा असं होतं, की आपण कुठल्यातरी मानसिक किंवा शारीरिक समस्येशी झगडत असतो आणि त्याचं उत्तर शोधायला आपण योगसाधना करायला लागतो. माझ्या बाबतीत माझ्या मैत्रिणीचा मुलगा अचानक गेला. घरी रोज येणारी व्यक्ती अचानक नाहीशी झाल्यावर मी स्वतः मानसिक धक्क्यामध्ये गेले आणि त्यानंतर मी योगसाधनेला माझे आत्मयोग गुरु डॉ. संप्रसाद विनोद यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात केली. योगसाधना करतानाच्या प्रवासात आपल्याला स्वत:बद्दलच बऱ्याच गोष्टी समजायला लागतात, अगदी स्वतःला आहे तसे स्वीकारण्याबाबत सुद्धा. साधनेमुळे माझा ताण हळूहळू कमी व्हायला लागला.





**ट्विन इंजिनिअर्स, भोसरी येथे घेतलेली योगसाधना कार्यशाळा**



**आत्मागुरु – डॉ. संप्रसाद विनोद**

मी सध्या योगसाधना नियमित करते. त्याच्यामुळे माझा सगळा संघर्षच कमी झालेला आहे. बऱ्याच वेळा आपण कित्येक गोष्टींशी झगडत असतो, आणि तिथे आपली बरीचशी शक्ती वाया जात असते. आता मला ती वाचवता येते आणि दुसऱ्या कामात योग्यपणे गुंतवता येते. जेव्हा समोरचा कसाही वागला तरी आपण त्याला प्रतिक्रिया न देता समजून घ्यायला लागतो तेव्हा संघर्ष टळतो आणि योग्य प्रकारे ती परिस्थिती हाताळू शकतो.

योगसाधना ही साधनेच्या काळापुरतीच मर्यादित राहत नाही. ही साधना तुमच्या दैनंदिन आयुष्यात झिरपत जाते. त्यातून जो स्वतःचा शोध घेतला जातो, त्यात आपल्या उणीवा दिसायला लागतात, चुका दिसायला लागतात, त्या नुसत्या दिसल्या तरी गळून पडायला लागतात. मग अर्थातच याचा प्रभाव आपल्या कामावरही दिसतोच. तेच काम कमी वेळात, सहजपणे व्हायला लागत. आपण शरीराशी आणि आपल्या कामाशी मैत्री करायला शिकतो. आपलं पूर्ण लक्ष त्या कामावर ठेवायला आपण शिकतो. आपण एक काम करत असताना आपल्याला multi-tasking करतोय असं का वाटत असतं? कारण हातातलं काम करता–करता, आपलं मन दुसरीकडे जातं आणि तिथून आपण चौथ्याच गोष्टीचा विचार करायला लागतो, यात खूप ऊर्जा जाते. जेव्हा तुम्ही नियमित योगसाधना करता तेव्हा तुम्ही जे काम करता त्यावेळी त्या कामाबरोबर रहायला शिकता. जेव्हा तुम्ही आतून स्वस्थ आणि शांत असता तेव्हा बाहेरच्या गोष्टींचा विचार करून जास्त चांगलं काम करू शकता. शिवाय आपण ज्या क्षेत्रात काम करतो आहोत त्या क्षेत्रात आपलं सर्वोत्तम काम करत रहायचं, या दोन गोष्टी निश्चित झाल्या की आयुष्यातला सगळा संघर्ष संपून जातो. यानंतर आयुष्यातला बराचसा भाग सहज व्हायला लागला.

## सामाजिक दायित्व

मी राजाभाऊ चव्हाण यांच्या दिशा परिवार या संस्थेला मला जमेल तशी मदत करते. ही संस्था मुख्यत: गरीब, पण बुद्धिमान मुलांना हेरते, त्यांच्या शिक्षणासाठी मदत करते किंवा मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करते. मी वरील दोन्ही प्रकारची मदत करते. याशिवाय मी माझ्याकडे येणाऱ्या मुलांशी संवाद साधते, त्यांना मार्गदर्शन करते. त्याचबरोबर वेगवेगळी माणसं जोडली जातात.

आमचं मूळ गाव चिंचोशी, जे आळंदीच्या पुढे आहे. हे गाव पुण्याच्या इतकं जवळ असूनही मुली पुढे शिकत नव्हत्या कारण गावात ७वी पर्यंतच शाळा होती. मग गावात ९वीच्या मुलींची लग्न करून द्यायचे. त्यानंतर गावकरी पुढे आले आणि पुढची शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. याच शाळेत मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. मी सुद्धा विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून मदत करत असते. प्रबोधिनीतले काहीजण जाऊन त्यांचं गुणवत्ता विकासाचं सत्र घेऊन आले, जवळपास वर्षभर हे काम चालू होतं. तिथल्या शिक्षकांची गुणवत्ता अजून सुधारावी म्हणून त्यांना विविध कौशल्यांसाठी मदत करण्यात आली.



**मूळ गाव चिंचोशी येथे १५ ऑगस्टला ध्वजारोहण**

## CSR मधून योगदान



प्रबोधिनीमध्ये गणेश पूजन – प्रेशंट सदस्यांची प्रबोधिनी भेट

Precient च्या CSR (Corporate Social Responsibility ) बद्दल सांगायचं झालं तर गावांकडे शिक्षण नीट होत नाही. अशा मुलांसाठी आपण काय करू शकतो असा विचार करून प्रबोधिनीबरोबर काम करायला सुरुवात केली. भारत सरकारच्या Ministry of Human resource and development ने पहिले ते दहावी च्या अभ्यासक्रमावर आधारित videos/eResource बनविण्याचे काम काही संस्थांबरोबरच प्रबोधिनीकडेही सोपवले आहे. ते व्हीडिओ https://diksha.gov.in (https://diksha.gov.in) या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. यातील मराठी माध्यमातील व्हीडिओसाठी २०१८ पासून Prescient साहाय्य करत आहे. हे व्हीडिओ विद्यार्थी पाठ्यपुस्तकामध्ये असलेल्या धड्याच्या खालील QR code मार्फत बघू शकतात. या शिवाय मागच्या वर्षीपासून प्रबोधिनीने कर्णबधिर मुलांसाठी eResource दीक्षा अंतर्गत व्हीडिओ बनवायला सुरुवात केली. यातील मराठी माध्यमातीलव्हीडिओंना देखील Prescient साहाय्य करीत आहे. हे eResource वरील वेबसाइटवर सर्वांसाठी कोणतीही फी न घेता उपलब्ध आहेत. कर्णबधिर मुलांसाठी बनविलेले मराठी व्हीडिओ अमेरिकेतील काही मराठी शाळादेखील वापरत आहेत. सरकारी शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आत्मनिर्भर भारत या योजने अंतर्गत पुण्याच्या आसपासच्या गावांतल्या ७५० शिक्षकांच्या प्रशिक्षणाला साहाय्य केले आहे.





जम्मू–काश्मिर ऑनलाईन करिअर गायडन्स सत्र

CSR म्हणताना नुसतं funds देऊन उपयोग नाही. आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो हीसुद्धा जाणीव कंपनी मधल्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण व्हायला पाहिजे, म्हणून कर्मचाऱ्यांनादेखील सहभागी करून घेतो. काही व्हीडिओमध्ये presenter म्हणून काहींनी काम केले, काही जणांनी वेल्ह्याच्या आसपासच्या गावात जाऊन शिकवणे, असे काही प्रयोग करून पाहीले. हे करत असताना कामात सूट मिळणार नाही, शनिवार–रविवार हे काम करावं लागेल असं असूनही ते आनंदाने सहभागी होतात. सगळ्यांना काहीतरी करायचं असतं, यानिमित्ताने त्यांना एक मंच मिळाला.





नागरीवस्तीतील विद्यार्थ्यांची कंपनी भेट

मध्ये सांगली आणि कराड भागात झालेल्या पुरात मदतकार्य म्हणून आमची काही लोकं गेली होती. पुण्यातील प्रबोधिनी काम करत असलेल्या काही नागरवस्त्यांमधल्या आठवी आणि नववीच्या मुलांना कंपनी बघायला बोलावलं होतं. कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी कम्प्युटरवर बनविलेले काही खेळ खेळायला दिले, आणि त्यातलं गणित समजावून सांगितलं, कंपनीमध्ये कशा स्वरूपाचे काम केले जाते हे त्यांना त्यांच्या भाषेत समजेल, अशी चित्रफीत दाखवली आणि काही fun activities घेतल्या, असा दिवसभराचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. कंपनीमधील माझ्या टीमचे यामध्ये मला मनापासून सहकार्य लाभले.

**जनप्रचोदित असे घडवावे**

**जानेवारी २०२० मध्ये आम्ही कंपनीमध्ये एक रक्तदान शिबिर घेतलं. किमान २५ लोकांनी असणं गरजेचं असतं. सकाळी ९ ते ११ असं ते शिबिर असणार होतं, खरंतर ते फक्त आमच्या कंपनी पुरतं आम्ही मर्यादित ठेवलं होतं पण बाकीच्या कंपनी मधलीही लोकं तिथे हळूहळू यायला लागली आणि ते शिबिर जवळपास ९ ते संध्याकाळी ७.३० इतकं मोठं झालं. २५ च्या ऐवजी ९० बाटल्या रक्त जमा झालं. आयत्या वेळी खूप साहित्याची जुळवाजुळव केली आणि त्याची व्याप्ती वाढवली. त्यानंतर बाकीच्या कंपन्यांनी पण विचारलं की पुढच्या वेळी आम्हालाही बोलवा, आम्हालाही सहकार्य करायला आवडेल. अर्थात कंपनी आर्थिक मदत करेलच, पण असं जर काम होत गेलं तर त्याची व्याप्ती वाढायला जास्त मदत होईल असं वाटत आहे. त्यांच्या कामाबरोबरच समाजाचं भानही वाढायला मदत होते. आजही कामाव्यतिरिक्त काय करता येईल असा विचार चालू असतो. आपण आपलं काम प्रामाणिकपणे करत राहिलो की आपोआप लोक जोडले जातात असा हा सगळा अनुभव होता.**

आपण भारतातली न्याय व्यवस्थेची स्थिती पाहिली तर जाणवतं, खरंतर आपले सगळे कायदे हे अतिशय चांगले बनवलेले आहेत. पण आपणही नागरिक म्हणून आपली जबाबदारी कशा प्रकारे उचलतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरतं. आपण हक्कांबद्दल बोलतो, पण कर्तव्य विसरून जातो. आपण ही कर्तव्यं जर सांभाळायला लागलो तर implementation करणं हे काही फार अवघड जाणार नाही. नागरिकशास्त्र शिकवताना एका विषयाच्या पुढे जाऊन काही शिकवायला पाहिजे असं वाटतं. ही मूल्ये लहानपणापासून बिंबवली जायला पाहिजेत. यासाठी तळमळीने काम करणाऱ्या शिक्षकांची गरज आहे. आज असे शिक्षक कमी दिसतात. हे असं का होतंय? याचा विचार केला गेला पाहिजे. एका चांगल्या शिक्षकामुळे आपण खूप सकारात्मक गोष्टी शिकतो. आज प्रबोधिनीसारखं मूल्याधिष्ठित शिक्षण सगळ्यांना मिळत नाही.

**स्त्री समाज हा जागृत करूनी**

स्त्री सशक्तीकरण याचा विचार करायचा तर शहरातल्या स्त्रिया आणि गावातल्या स्त्रिया यांचा वेगळा विचार करायला हवा. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यामध्ये धूसर रेषा आहे. कितीही नाही म्हणलं तरी महिलांवर आज कुटुंबाची जबाबदारी जास्त आहे. तुमच्या कुटुंबाचा तुमच्या आयुष्यातला सहभाग कसा आहे याचाही विचार करायला हवा. स्वातंत्र्य हे स्वैराचाराकडे जायला नको. जसं की जर मला पार्टीला जायचय आणि मुलाची परीक्षा आहे किंवा तो आजारी आहे तर इथे काय निवडायचं? यामध्ये स्वातंत्र्य आहे की स्वैराचार? आणि आज माझी अत्यंत महत्त्वाची बैठक आहे किंवा काम आहे, आणि मुलगा आजारी आहे तर या परिस्थितीमध्ये काय निवडायचं; मला वाटतं हा स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातला मुख्य फरक आहे. या दोन्हीतला फरक जर लक्षात येईनासा झाला तर अवघड परिस्थिती येते. हे झालं शहरातील स्त्रियांबाबत. खेड्याच्या बाबतीत बोलायचं झालं तर त्यांना शिक्षणही मिळत नाही, तिथे आपण सशक्तीकरण म्हणजे काय कसं सांगणार. त्यांचे प्रश्न वेगळे आहेत, आणि त्यांना त्यांच्याच भाषेत समजावून सांगत, त्यांच्यातील आत्मबल वाढवत पुढे जावं लागेल. महिला सबलीकरणाचा विचार करताना सगळीकडे एकच फुटपट्टी लावून आपण हे मोजू शकू असं मला वाटत नाही. काय प्रश्न आहे हे पाहून त्याप्रमाणे उपाय योजना कराव्या लागणार आहेत.



**नागरवस्ती अभ्यासगट प्रशिक्षण वर्ग**

एक महिला उद्योजिका म्हणून बोलायचं झालं तर मला वैयक्तिक असा कधी भेदभाव सहन करायला लागला नाही. जर तुम्ही तुमच्या क्षेत्रात आणि ज्ञानामध्ये तरबेज असाल, तुमचं काम व्यवस्थित असेल तर कितीही नाही म्हटलं तर समोरच्यापर्यंत ते पोचतच. प्रबोधिनीमधून जो आत्मविश्वास मिळालेला आहे त्यामुळे भेदभाव कोणी करत नाही. शिवाय तुमच्या कामाला तुमच्यापेक्षा जास्त बोलू द्यावं असं बघायला हवं.

**मूल्य आणि तत्त्व**

आज मागे वळून बघताना प्रबोधिनीतून जे शिक्षण मिळालेलं आहे, मग ते कोणत्याही प्रकारचं असू दे, ते सगळं आत्ता महत्त्वाचं वाटतं. मूल्य आणि तत्त्वांशी ठाम रहायला शिकले. गोष्टी आपल्यापुरत्या न ठेवता इतरांना द्यायला शिकले. बोलण्यापेक्षा वागण्यातून ते पोचवायला शिकले. आपण मूल्याधिष्ठित शिक्षण घेताना प्रबोधिनीमध्ये ती उदाहरणं प्रत्यक्ष

बघितली आहेत. ते बघत आपण घडलो. नुसत्या भाषणांपेक्षा आपण त्यांच्या वागण्यातून गोष्टी शिकलो. त्यामुळे मला असं वाटतं की नेत्याने कमीत-कमी बोलावं. आपल्याला जो संदेश द्यायचा आहे तो आपल्या वागण्यातून पोचवावा. तरच आपल्या सहकाऱ्यांमध्ये दीर्घकाळ आणि खरे बदल घडतात. वागणं म्हणजे दिखावा नाही तर ती तत्त्व खरी दिसली पाहिजेत. मी माझ्या मुलाला कायम सांगते की शिक्षणाबरोबरच एक चांगला माणूस असणं खूप जास्त महत्त्वाचं आहे. अर्थात शब्दांची गरज लागतेच, ते योग्य ठिकाणी वापरावेच. पण आपण फक्त बोलत राहिलो तर त्याची किंमत रहात नाही. दिखाव्यापेक्षा आणि स्वार्थापेक्षा मोठं काम करायला लागलो, की लोकं आपल्याला साथ देत राहतात.

आज IT क्षेत्राबद्दल बोलायचं झालं तर, त्यांना समाजाप्रती काहीच जाणीव नाही किंवा जबाबदारी नाही असं सामान्यतः बोललं जातं, पण आमच्या कंपनीमध्ये आम्ही बदल घडवून आणू शकलो याचा नक्की आनंद आहे.

**प्रबोधिनीतले गुरु असं म्हणताना गिरीशरावांचं नाव सगळ्यात पहिले डोळ्यासमोर येतं. ते आम्हाला गणित आणि रसायनशास्त्र शिकवायचे. आम्ही जेव्हा १०वीत होतो, आम्ही शाळेत असायचो त्यावेळात ते आमच्या सगळ्यांच्या घरी जाऊन आले होते, माझ्या धनकवडीच्या घरी ते सायकल वरून आले होते. घरची परिस्थिती कशी आहे, अभ्यास कसा करू शकते, या सगळ्यासाठी त्यांनी घेतलेले एवढे परिश्रम खूप विशेष वाटतात. जेव्हा माझी योगसाधना सुरू झाली तेव्हा डॉ. संप्रसाद विनोद या गुरुंकडून मी स्वतःतील नकारात्मकता व त्यावरील मात कशी करावी हे समजून घ्यायला शिकले.**

आजही आम्ही वर्गातल्या मैत्रिणी भेटतो, चर्चा करतो, आमचं नातं तसं दृढ आहे. शाळेत होतं तसच निखळ नातं आजही टिकून आहे.

आपण एक माणूस म्हणून जर आपल्या सगळ्या जबाबदाऱ्या ओळखायला शिकलो, काम प्रामाणिकपणे, उत्तमतेने जर करत राहिलो, तर ते कायमस्वरूपी लोकांपर्यंत पोचेल. प्रबोधक म्हणून आज आपली ही जबाबदारी आहे की ही तत्त्व समाजापर्यंत पोचवण हे आपलं काम आहे असं मला वाटतं आणि त्यामुळे ही परंपरा कायम पुढे चालू राहील.



**आई-बाबा आणि बहिणींबरोबर**



**मुलगा, चि. अपूर्व व श्री. प्रवीण वाघमारे यांच्याबरोबर**



**काही पेन्सिल स्केचेस**

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट - Sound Of Music


२. आवडतं पुस्तक- Nine Secrets of meditation, योग आणि मन, power of now

३. छंद- चित्रकला, कविता करते कधीतरी आणि बागकाम

४. पहिली प्रतिक्रिया

- अध्यात्म- Inner Journey
- वकील - जबाबदाऱ्या
- कामगार- Asset
- ज्ञान प्रबोधिनी- सर्वांगीण विकास
- आप्पा पेंडसे- तेथे कर माझे जुळती

५. पुन्हा आयुष्यात जर संधी मिळाली तर मला शेती करायला व त्यामध्ये वेगवेगळे प्रयोग करायला नक्की आवडेल.



**ख्वाईशें**

**दीप्ती निकम - वाघमारे**
**9822289658**
**deeptiw@pre-scient.com**

**मुलाखत - चिन्मयी खरे, अथर्व पाटणे** **शब्दांकन - चिन्मयी खरे**

**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org